## जेष्ठमध

***Glycirrhiza glabra*** **L.** Family **– Fabaceae**





**विविध भाषांमधील नावे: मराठी:** जेष्ठमध, यष्टिमधु; **संस्कृत:** यष्टीमधुह, मधुका;
**हिंदी:** मुलेठी, जोतीमध; **इंग्लिश: liquorice.**

**Morphology:**

A perennial shrub, about 2.5 m. Leaves compound, 4-7 pairs, oblong, elliptical or lanceolate leaflets. Flowers papilionaceous, in axillary spikes, lavender to violet. Fruit compressed pod, glabrous, pitted, seeds 3-5 brown, reniform.

**वनस्पतीचे वर्णन:**

जेष्ठमधाचे झुडूप ३ ते १० फूट उंच वाढते. पाने संयुक्त, हिरवीगार असतात. पर्णिकेच्या ४ - ७ जोड्या असतात. फुले जांभळ्या रंगाची, मोठ्या दांड्यावर येतात. शेंगा चपट्या, लांबट, फिकट तपकिरी असतात. बिया २ - ५, गुळगुळीत, गोलाकार, चौकोनी असतात.

**बहर येण्याचा कालावधी :** जून ते जुलै

**औषधी उपयोग:**

सर्दी खोकला व कफ कमी करण्यासाठी जेष्ठमध चा उपयोग केला जातो. जेष्ठमध, पावडर व झाडाचे मूळ या रूपात उपलब्ध असते. कफामुळे जर नाक व छाती मध्ये जळजळ होत असेल तर जेष्ठमधाचे चाटण घ्यावे. मोठ्या व्यक्तीसाठी ज्येष्ठमधाची पावडर वापरावी व लहान मुलांना जेष्ठमधाचे मूळ पाण्यासोबत उगाळून पाजावे. जेष्ठमध स्मरणशक्ती वाढवते. जेष्ठमध हलके असल्याने खाल्लेले अन्न पचवण्यासाठी उपयुक्त आहे. पोटाच्या समस्यांमध्ये जेष्ठमध गुणकारी आहे. माईग्रेन व तीव्र डोकेदुखी मध्ये जेष्ठमधाचा वापर केला जातो. यासाठी जेष्ठमध पावडर मध मध्ये मिळवून नाकात दोन थेंब टाकावे. केसांसाठीही जेष्ठमध उपयुक्त आहे. यासाठी जेष्ठमध पावडर म्हैशीच्या च्या दुधात मिसळून केसांना लावावी. असे केल्याने केस गळणे थांबते.

**लागवड:**

जेष्ठमध ही बहुवर्षायू वनस्पती असून तिची लागवड फेब्रुवारी किंवा जुलै महिन्यात केली जाते. याची लागवड खोडाच्या १५ - २५ सेमी. लांब तुकड्यांपासून केली जाते. गादी वाफ्यावरती रोपे तयार करून त्यानंतर जमिनीमध्ये ९० x ४५ से.मी. अंतरावर लावली जातात. या पिकाला खतांची गरज नसते. जमिनीचा पोत चांगला नसेल तर लागवडपूर्व मशागत करताना शेणखत किंवा गांडूळखत यांचा वापर करावा. साधारणपणे अडीच वर्षांनी याचे उत्पादन घेता येते. चांगल्या दर्जाचे औषधी घटक मिळविणेसाठी नोव्हेंबर किंवा डिसेंबर मध्ये उत्पन्न घ्यावे. काढणी नंतर मुळे सूर्यप्रकाशामध्ये वाळवून नंतर त्यांची प्रतवारी करावी व हवाबंद कंटेनर मध्ये साठवून ठेवावे.